हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
21km
Associate Sponsor RISO
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

उपक्रमाचा साक्षीदार व्हावे

'लोकमत' आयोजित औरंगाबाद महामॅरेथॉन या उपक्रमामुळे दि. १७ डिसेंबर रोजी औरंगाबादवासीयांना एका ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्याची संधी मिळणार आहे. प्रामुख्याने फिटनेस आणि औरंगाबाद शहरासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जे लोक धावपटू म्हणून या उपक्रमात सहभागी होत नसतील त्यांनी धावपटूंना प्रोत्साहित करण्याचे महत्त्वपूर्ण काम करावे आणि या उपक्रमाचा एक भाग बनावे.

- **प्रीतम सुभाष गोसावी** संचालक, एसएस प्रो.

सगळीकडे प्रचंड उत्साह

गेल्या वर्षी 'लोकमत महामॅरेथॉन'च्या धमाकेदार यशामुळे शहरवासीयांना यंदाच्या मॅरेथॉनचे वेध लागले आहेत. एवढ्या भव्य प्रमाणात आयोजित केल्या जाणाऱ्या या स्पर्धेविषयी उत्साह दिसून येत आहे. असे ऊर्जात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी 'लोकमत'चे कौतुक केले पाहिजे. यामुळे शहरात आरोग्य व खेळांविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण होण्यास मदत होईल. आता प्रतीक्षा केवळ १७ डिसेंबरची.

- **पारस ओस्तवाल**, सीएमडी, पी ओस्तवाल ग्रुप

मित्तल ऑप्टिकल्स- (डावीकडून) प्रशांत भालेराव, भारत बारकुले, अमोल देवकाते, अनिश वागचरे, नितीन दरबस्तवार, माधुरी तायल, नीलेश मित्तल (संचालक), अर्चना मित्तल, अस्मिता हिवराळे, अश्विनी गर्गे, अजय गायकवाड, आकाश म्हस्के, समीर खान पठाण, किशोर नरगडे.

सुजाता इलेक्ट्रिकल्स- सरिता शेळगावकर, किरण कायस्थ, दर्शन पारसवानी, गिरीश चंचलानी, राहुल गणराज.

फिटनेस पार्टीत अनुभवा महामॅरेथॉनचे पूर्वरंग

धमाल आणि व्यायाम : सहभागी धावपटूंसाठी विशेष आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : दि. १७ डिसेंबर रोजी 'लोकमत'च्या पुढाकाराने होत असलेल्या सॅफ्रॉन लॅण्डमार्क प्रस्तुत महामॅरेथॉनच्या निमित्ताने अवघे शहरच एका ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होणार आहे. धावपटूंमध्ये तर महामॅरेथॉनचा 'फिव्हर' चढतोच आहे. हा उत्साह अजून वाढविण्यासाठी आणि धमाल करीत व्यायामाचा आनंद लुटण्यासाठी बुधवार, दि. १३ डिसेंबर रोजी पुन्हा एकदा भव्य 'फिटनेस पार्टी'चे आयोजन करण्यात आले आहे.

प्रोझोन मॉल येथे सायं. ६ वा. ही पार्टी होणार आहे. महामॅरेथॉनदरम्यान नावनोंदणी केलेल्या प्रत्येकासाठी प्रवेश खुला आहे. ज्या धावपटूंनी महामॅरेथॉनसाठी उशिरा नावनोंदणी केली त्यांना पहिल्या फिटनेस पार्टीचा आनंद लुटता आला नाही, त्यामुळे आता या दुसऱ्या फिटनेस पार्टीत अवश्य सहभागी व्हा आणि आपल्या मित्रमंडळींसोबत महामॅरेथॉनचे पूर्वरंग अनुभवा.

फिटनेस पार्टीदरम्यान तज्ज्ञांकडून फिटनेससंदर्भातल्या नवनवीन गोष्टी शिकून धावण्यासाठी अधिक सक्षम बनण्याची संधी धावपटूंना मिळणार आहे. भांगडा, झुंबा, पिलोझिंग, मसाला बॉलीवूड यासारखे व्यायामाचे नवे प्रकार यामध्ये शिकवले जातील. केवळ प्रवेशिकांद्वारेच या पार्टीत प्रवेश दिला जाईल. दि. १३ रोजी रिगल लॉन, लोकमत भवन आणि प्रोझोन मॉल येथे दु. ४ वाजेपर्यंत फिटनेस पार्टीच्या मोफत प्रवेशिका उपलब्ध असतील. धावपटूंनी या प्रवेशिका घेऊन पार्टीत सहभागी व्हावे. प्रवेश मर्यादित असल्यामुळे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य. कार्यक्रमाचे सर्व हक्क आयोजकांकडे राखीव आहेत. अधिक माहितीसाठी ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

दिव्यांग, ज्येष्ठांचा नारा 'हैं तय्यार हम'

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : 'आम्हाला वेळ लागेल; पण आम्ही आमच्या ध्येयापर्यंत निश्चितपणे पोहोचू.. भलेही सावकाश जाऊ, पण ध्येय निश्चितपणे गाठू.. औरंगाबाद महामॅरेथॉनसाठी हैं तय्यार हम..!' असा विश्वास उराशी बाळगत अनेक दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक दि. १७ डिसेंबर रोजी होणाऱ्या औरंगाबाद महामॅरेथॉनच्या महासोहळ्यात सहभागी होणार आहेत. सामाजिक भावना जपण्यासाठी 'लोकमत'ने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

ज्येष्ठ व दिव्यांग व्यक्तींची महामॅरेथॉन विभागीय क्रीडा संकुल येथे स. ८ वा. सुरु होईल. 'लोकमत'च्या पुढाकाराने आयोजित सॅफ्रॉन लॅण्डमार्क प्रस्तुत या सोहळ्यातील दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग अनेकांना निश्चितच प्रेरणादायी ठरेल. त्यांची जिद्द, आत्मविश्वास, साहस याची प्रचीती या स्पर्धेदरम्यान दिसून येईल. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या (घाटी) वार्धक्य विभाग प्रमुख डॉ. मंगला बोरकर ज्येष्ठांसाठी समन्वयक म्हणून काम बघतील.

नवजीवन सोसायटी मतिमंद मुलांची संस्था या उपक्रमात सहभागी झाली असून, दिव्यांग व्यक्तींसाठी नवजीवन सोसायटीच्या संचालिका शर्मिला गांधी या समन्वयक म्हणून काम पाहतील.

महामॅरेथॉनसाठी अनेक ज्येष्ठ नागरिकांनी व दिव्यांग व्यक्तींनी नावनोंदणी केलेली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी दोन गट ठेवण्यात आले आहेत

एका गटात ६० ते ७० वर्षे या वयोगटातील ज्येष्ठ नागरिक असतील, तर दुसरा गट ७१ वर्षांपेक्षा अधिकच्या ज्येष्ठांसाठी असेल. महामॅरेथॉनसाठी येताना ज्येष्ठांनी, तसेच दिव्यांग व्यक्तींनी त्यांचे डॉक्टरांनी दिलेले फिटनेस प्रमाणपत्र, आवश्यक औषधी, तसेच एखाद्याला सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे.

घाटीत ४९ कर्मचाऱ्यांची कामाला दांडी

१४ कर्मचारी सतत गैरहजर : काम न करताही मिळते काहींना वेतन

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : घाटी रुग्णालयातील तब्बल ४९ कर्मचाऱ्यांनी महिनाभरात कामाला दांडी मारल्याचे समोर आले आहे. यामधील १४ कर्मचारी मागील काही दिवस सतत गैरहजर आहेत. कामावर न येऊनही काहींचे वेतन अदा करण्याचा प्रकार होत असल्याचे समजते.

घाटी रुग्णालयात साफसफाईपासून अनेक कामांमध्ये चतुर्थश्रेणी कर्मचारी महत्त्वाची भूमिका निभावतात. रुग्णसंख्येमुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण येतो. सर्व परिस्थितीला सामोरे जात कर्मचारी कामाची जबाबदारी पार पाडतात; परंतु काही कर्मचारी याला अपवाद ठरत आहेत. कोणतीही कल्पना न देता कामावर गैरहजर राहण्याचे प्रकार घडत आहे. एक दिवसापासून तर २५ ते ३० दिवसांपर्यंत सलग अनुपस्थित राहण्याचे प्रमाण आढळून येत आहे.

महिनाभरात ४९ कर्मचारी कामावर गैरहजर होते. यामध्ये १४ कर्मचारी तर सतत गैहजर राहत आहेत. गेल्या काही महिन्यांपासून काही कर्मचाऱ्यांना कामावर न येताही वेतन दिले जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली. ही बाब घाटी प्रशासनाच्याही निदर्शनास आली आहे. त्यामुळे याविषयी कडक पाऊल उचलून कर्मचाऱ्यांची उपस्थिती तपासली जात आहे. काही जणांच्या दबावामुळे गैरहजर कर्मचाऱ्यांची हजेरी दाखवूनही वेतन देण्याचा प्रकार केला जातो. दुसरीकडे काही कर्मचाऱ्यांनी स्वत:च्या जागी बदली कर्मचारी ठेवल्याचेही समजते.

पूर्ण वेतन कपात

कर्मचाऱ्यांची उपस्थिती ही प्राधान्याने तपासली जाते. यामध्ये गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन दिले जात नाही. ४९ कर्मचाऱ्यांची पूर्ण वेतन कपात केली जाणार आहे. गैरहजर असूनही वेतन देण्याचा कोणताही प्रकार होत नाही.

-**डॉ. भारत सोनवणे**, वैद्यकीय अधीक्षक, घाटी रुग्णालय

निदर्शनामध्ये सहभागी झालेले 'एसएफआय'चे सदस्य.

'विद्यार्थ्यांची थकीत शिष्यवृत्ती द्या'

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : गेल्या दोन-तीन वर्षांपासून शासनाच्या विविध शिष्यवृत्त्या विद्यार्थ्यांना मिळण्यास विलंब होत आहे. तसेच अनेकांची शिष्यवृत्ती थकीत आहे. शासनाने ही थकीत शिष्यवृत्ती तात्काळ वाटप करावी, अशी मागणी 'स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडिया' (एसएफआय) या संघटनेतर्फे करण्यात आली आहे.

शिष्यवृत्तीबाबत शासनाचे उदासीनतेविरोधात संघटनेने मंगळवारी (दि.१२) समाजकल्याण कार्यालयासमोर घोषणाबाजी करून निदर्शने केली.

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या ओबीसी, एनटी व इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांची बंद करण्यात आलेली शिष्यवृत्ती पूर्ववत सुरु करावी, खुल्या प्रवर्गातील मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्यावी, महागाईनुसार शिष्यवृत्तीमध्ये वाढ करावी, ऑनलाईन अर्ज प्रक्रियेतील अडचणी व गोंधळ दूर करावा, अशा विविध मागण्यांचे निवेदनाद्वारे करण्यात आले आहे.

यावर सुनील राठोड, नितीन वाव्हळे, रखमाजी कांबळे, अभिमान भोसले, सत्यजित मस्के, प्राजक्ता शेटे, बाबाराव भोसले, लोकेश कांबळे, प्रदीप सुरवसे, केशव राऊत, मनीषा मगरे, सीमा जोगदंड, भगवान रोटे, रवी मोताले, मोनिसा पठाण, शंकर तापरे, अरविंद भूतकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पाणीयुक्त इंधनाने बंद पडली वाहने

अपारदर्शक : भाजप पदाधिकाऱ्यांच्या गाड्या

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : परळीतील गोपीनाथगडावर लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन करण्यासाठी निघालेल्या भाजप पदाधिकाऱ्यांच्या ताफ्यातील वाहनात औरंगाबाद ते बीड रोडवरील भोकरवाडी येथील राजर्षी शाहू पेट्रोलपंपावर पाणीयुक्त इंधन भरल्याचा प्रकार उघडकीस आला. इतर नागरिकांच्या वाहनातही पाणीयुक्त इंधन भरल्यामुळे ती वाहने बंद पडली.

औरंगाबाद शहरातील पेट्रोलपंपावर भेसळयुक्त इंधन वाहनात भरण्याचा प्रकार काही दिवसांपूर्वीच उघडकीस आल्यानंतर औरंगाबाद ते बीड रोडवरील पेट्रोलपंप संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. मराठवाड्यातील सर्वच पेट्रोलपंप तपासण्याची गरज यानिमित्ताने निर्माण झाली आहे.

इतर वाहनांनी गेवराईपर्यंत प्रवास करून भाजप प्रदेशाध्यक्ष डॉ.भागवत कराड, बालाजी मुंडे व इतर पदाधिकारी टॅक्सीने परळीकडे रवाना झाले. त्यांच्या चारचाकीलाही टोचण लावून गेवराईपर्यंत नेल्यानंतर तेथे दुरुस्तीसाठी संबंधित वाहन मोबाईल गॅरेजच्या हवाली करण्यात आले.

राजर्षी शाहू पेट्रोलपंपावर भाजप पदाधिकाऱ्यांनी इंधन भरल्यानंतर फॉर्च्युनर चालू झालीच नाही. इतर नागरिकांची वाहनेदेखील इंधन भरल्यानंतर सुरु झाली नाहीत. त्यामुळे वाहनातील इंजिनमध्ये तपासणी केली असता पाणी आणि इंधन एकत्रच बाहेर आले. याप्रकरणी डॉ. कराड यांनी जालना पुरवठा अधिकारी आर. एस. नंदकर यांच्याकडे तक्रार केली. शिवाय हिंदुस्तान पेट्रोलियमचे विक्री व्यवस्थापक थॉमस यांच्याकडेही घडलेला प्रकार सांगितला.

पुरवठा अधिकारी म्हणाले

- जालन्याचे पुरवठा अधिकारी नंदकर यांनी सांगितले, औरंगाबादेत एच.पी.चे विक्री अधिकाऱ्यांचे कार्यालय आहे. त्यांना याप्रकरणी कळविले आहे. तसेच तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्याला भोकरवाडीतील त्या पेट्रोलपंपावर इंधनाचे नमुने घेण्यासाठी पाठविले आहे.

इंधनात पाणी असल्यामुळे डॉ.भागवत कराड यांची चारचाकी बंद पडली. बाटलीत इंधन बाहेर काढल्यावर त्यात असलेले पाणी पाहताना डॉ.कराड. दुसऱ्या छायाचित्रात बाटलीच्या तळाला साचलेले पाणी.

या तर चोरांच्या उलट्या बोंबा...

वाळू व्यावसायिकांचा मोर्चा : भापकरांची टीका

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : राज्य वाळू वाहतूक संघर्ष समितीतर्फे १४ डिसेंबर रोजी विभागीय आयुक्त कार्यालयावर महामोर्चा काढण्यात येणार आहे; परंतु हा मोर्चा म्हणजे चोरांच्या उलट्या बोंबा असल्याची प्रतिक्रिया विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी मंगळवारी पत्रकारांशी बोलताना दिली. वाळू चोरी प्रकरणात वारंवार दोषी आढळणाऱ्यांवर यापुढे निश्चितपणे कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला.

महसूल आणि पोलीस विभागाचे अधिकारी, कर्मचारी वाळू वाहतूकदारांना त्रास देत चुकीची कारवाई करीत असल्याच्या निषेधार्थ गुरुवारी समितीतर्फे क्रांतीचौक ते विभागीय आयुक्तालयापर्यंत मोर्चा काढण्यात येणार आहे.

डॉ. भापकर म्हणाले, जिल्ह्यासह विभागात वाळूपट्ट्यांत वारंवार चोरटी वाहतूक करणाऱ्यांवर एमपीडीएची कारवाई करण्यात येईल. विभागातील २८६ पैकी फक्त २० पट्ट्यांच्या लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्या पट्ट्यांतून वाळू उपसा करण्यासाठी अद्यापही परवानगी दिलेली नाही. मात्र, विभागात काही ठिकाणी चोरट्या मार्गाने वाहतूक होत असल्याचे समोर येत आहे. अवैध मार्गाने वाहतूक करूनसुद्धा शासन व अधिकाऱ्यांच्या विरोधात मोर्चा काढणे म्हणजे चोरांच्या उलट्या बोंबा असे म्हणण्याची वेळ आली आहे. मात्र, यापुढे चोरटी वाहतूक करणारी वाहने जप्त करून वारंवार दोषी आढळणाऱ्या वाहतूकदारांवर एमपीडीएची कारवाई करण्यात येईल, असे भापकर यांनी स्पष्ट केले. मंगळवारी वाळूपट्ट्यांबाबत अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. चोरटी वाहतूक करणाऱ्यांवर कारवाईचे आदेशही दिले.

बहुतेक वाळूपट्ट्यांचा लिलाव न होताच ते दरवर्षीच्या हंगामात चोरट्या मार्गाने रिकामे होतात. यामध्ये महसूल आणि पोलीस यंत्रणेचाही सहभाग असल्याचे वारंवार आरोप होतात. शिवाय सरकारचा महसूलही बुडतो. जे पट्टे अधिकृत आहेत, तेथील वाहतूकदारांवरदेखील कारवाई होते. गव्हाबरोबर किडे रगडण्याच्या या प्रकाराविरोधात राज्य वाळू वाहतूक संघर्ष समिती मोर्चा काढणार असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

मोहिमांचा निव्वळ फार्स : शहरात १३५ कोटींची थकबाकी

महावितरणला आर्थिक विवंचना

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : शहरातील घरगुती, व्यावसायिक आणि उद्योजक ग्राहकांकडे तब्बल १३५ कोटी रुपयांची, तर परिमंडळांतर्गत औरंगाबाद आणि जालना या दोन जिल्ह्यांत कृषिपंपधारकांकडे ३९९ कोटी रुपयांची थकबाकी आहे. या आठवड्यात शहरातील थकबाकी वसुलीसाठी मोहीम राबवून अहवाल सादर करण्याचे आदेश शाखा अभियंत्यांना दिले आहेत. याशिवाय कृषिपंपांची थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांच्या विद्युत वाहिन्याच बंद करण्यात आल्या आहेत.

यासंदर्भात मंगळवारी पत्रकारांशी बोलताना मुख्य अभियंता सुरेश गणेशकर यांनी सांगितले की, औरंगाबाद परिमंडळांतर्गत एकूण ६७४ वाहिन्या असून, यापैकी ५० टक्के वाहिन्या बंद करण्यात आल्या आहेत. बिल न भरणाऱ्या कृषिपंपधारकांना वीजपुरवठा करणाऱ्या वाहिन्या बंद करण्याचा निर्णय महावितरण कंपनीने घेतला आहे. कृषिपंपांना वीजपुरवठा करणाऱ्या एकूण १६,००० रोहित्रांपैकी ७ हजार ९१४ बंद करण्यात आले आहेत. यामध्ये २८० रोहित्र नादुरुस्त आहेत. शेतकऱ्यांनी थकबाकी भरल्याशिवाय रोहित्रांची दुरुस्ती केली जाणार नाही. सध्या १ लाख ७ हजार ३२९ कृषिपंप यामुळे बंद पडले असून, यांच्याकडे ३९९ कोटी रुपये एवढी थकबाकी आहे.

शहरात १ लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेले २,२५० ग्राहक असून, त्यांच्याकडे ४३ कोटी रुपये एवढी थकबाकी आहे. यामध्ये घरगुती वापर असलेल्या ग्राहकांची संख्या सर्वाधिक आहे. या आठवड्यात सर्व शाखा अभियंत्यांना बिल दुरुस्ती, वसुली, वीजपुरवठा खंडित करून मीटर काढून आणण्याची कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दोन अधिकाऱ्यांवरच कारवाई

- थकबाकी वसुलीमध्ये कमी पडलेले शहराचे कार्यकारी अभियंता अर्शद पठाण व छावणी उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता विनय घनबहादूर या दोघांच्या बदल्या दुसऱ्या जिल्ह्यांमध्ये करण्यात आल्या आहेत. तथापि, शहर क्रमांक १ व शहर क्रमांक २ मध्ये एकूण ८ उपविभाग आहेत. या उपविभागांत थकबाकी वसुलीचे काम उत्कृष्ट झाले आहे काय, या प्रश्नावर गणेशकर म्हणाले की, उर्वरित उपविभागांमध्ये वसुली चांगलीच आहे, असे म्हणावे लागेल. तथापि, या आठ उपविभागांपैकी एकट्या छावणी उपविभागामध्ये ६० हजार ग्राहक संख्या आहे. उर्वरित उपविभागांमध्ये कुठे २०, तर कुठे ३० अशी ग्राहक संख्या असताना मनुष्यबळ मात्र सर्व ठिकाणी सारखेच आहे. असे असताना मुख्य अभियंत्यांनी एकट्या छावणी उपविभागाच्या अधिकाऱ्यावर एकतर्फी कारवाई केल्याचा आरोप कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात आला आहे.

दोन दिवसीय संप : वेतन करार आणि इतर मागण्यांसाठी देशव्यापी आंदोलन

बीएसएनएल कर्मचाऱ्यांचा संप सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : बीएसएनएल टॉवर उपकंपनी स्थापन करून त्याद्वारे टेलिकॉम उद्योगावर कब्जा मिळवू पाहणाऱ्या देशी-विदेशी कंपन्यांना सरकारची पाठराखण मिळत आहे. बीएसएनएलच्या मुळावर घाव घालून टॉवर उपकंपनी स्थापन करण्याचा निर्णय रद्द करावा आणि बीएसएनएल कर्मचाऱ्यांना तिसरा वेतन करार लागू करावा, अशा मागण्या करत बीएसएनएल कर्मचाऱ्यांच्या दोनदिवसीय लाक्षणिक संपाला मंगळवारी (दि.१२) सुरुवात झाली.

हा संप देशव्यापी स्वरूपाचा असून, यामध्ये एकूण १३ संस्था सहभागी झाल्या आहेत. सिडको परिसरातील संचार सदन येथे स. ११ वाजता संपाला सुरुवात केली. यावेळी जाहीर सभा घेऊन दोन दिवस शांततेच्या माध्यमातून संप पुकारण्याचे आवाहन करण्यात आले. डॉ. भालचंद्र कांगो यांनी सभेला मार्गदर्शन करून संपाला पाठिंबा दर्शवला. कॉ. जॉन वर्गीस, कॉ. रंजन दाणी, कॉ. एस. आर. वाणी, कॉ. विलास सवडे, कॉ. शिवाजी चव्हाण, कॉ. भीमराव गणकवार यांनी या संपाचे नेतृत्व केले.

१ जानेवारी २०१७ पासून बीएसएनएल कर्मचाऱ्यांचा वेतन करार प्रलंबित आहे. वेतनवाढीचा संबंध कंपनीच्या नफ्याशी जोडला जात आहे. नफ्याची अट शिथिल करण्याची शिफारस करावी आणि कॅबिनेटने त्यास तात्काळ मंजुरी देऊन वेतन करार लागू करावा, अशी मागणीही यातून पुढे आली. जाहीर सभेनंतर कर्मचाऱ्यांनी सुभेदारी विश्रामगृह येथे जाऊन खा. चंद्रकांत खैरे यांच्याकडे निवेदन दिले.

बुधवारी (दि. १३) संचारसदन येथे सकाळी ११ वाजता जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असून, उद्धव भवलकर यांची उपस्थिती असणार आहे.

सिडको येथील संचार सदन येथे संपादरम्यान एकत्रित आलेले बीएसएनएल कर्मचारी.

पक्षी महोत्सवाचे जानेवारीत आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : एन्व्हायर्नमेंट रिसर्च फाऊंडेशन, वनविभाग, वन्यजीव विभाग, सामाजिक वनीकरण, इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स आणि निसर्ग मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ६ व ७ जानेवारी २०१८ रोजी पक्षी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात पक्षी छायाचित्र स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत एका छायाचित्रकाराला पाच छायाचित्रे पाठविता येतील. १२ बाय १८ या पेपरवर छायाचित्र प्रिंट केलेले असावे. शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे, 'चिमण्या गेल्या कुणीकडे', 'वृक्ष लागवड हा प्रभावी पर्याय आहे का', 'शास्त्रज्ञ म्हणून तुम्ही पृथ्वी कशी वाचवाल आणि पक्षी स्थलांतर' यापैकी एका विषयावर निबंध पाठवावा लागेल. खुल्या गटासाठी 'निबंध पक्षी पर्यटन', 'जायकवाडी-एक समुद्र', 'पक्षी अभ्यारण्य', 'माझ्या शहराचे पर्यावरण-समस्या आणि उपाय व प्राचीन भारतातील पक्षी जीवन', या विषयांपैकी एका विषयावर निबंध लिहावा लागणार आहे. नि:शुल्क स्पर्धा असून, २५ डिसेंबरपर्यंत निबंध व छायाचित्र स्वीकारले जातील. विजेत्यांना महोत्सवात बक्षीस देण्यात येईल, असे सीएमआयएचे अध्यक्ष प्रसाद कोकीळ यांनी कळविले आहे.

२५ कॉपीबहाद्दरांवर भरारी पथकाची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या परीक्षेला २८ नोव्हेंबरपासून सुरुवात झाल्यापासून आतापर्यंत एकूण २५ कॉपीबहाद्दरांवर भरारी पथकाने कारवाई केलेली आहे.

अभियांत्रिकी परीक्षेच्या पहिल्याच दिवशी बीड जिल्ह्यात १० दहा जणांवर, तर ८ ते ११ डिसेंबरदरम्यान तुळजापूर व इतर शहरांत १५ जणांवर कॉपी केल्यामुळे कारवाई करण्यात आली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक दिगंबर नेटके यांनी मंगळवारी (दि. १२) उस्मानाबाद जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या.

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार
सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ, कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी), फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे आता अत्याधुनिक विना दुष्परिणाम बोटॉक्स इंजेक्शन उपचारा द्वारा वेदनेपासुन मुक्ती मिळवून आपण गुडघ्याचे व पाठीचे ऑपरेशन काही काळास्तव टाळू शकता.
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे)
सोमवार ते शुक्रवार फक्त

वाहन चालवीत असताना मोबाइलचा वापर करू नका.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521